दिनांक- 29/02/2022

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,

बारामती

विषय- राष्ट्रीय विज्ञान दिन अहवाल

महोदय,

विद्यार्थ्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा या हेतूने राष्ट्रीय विज्ञान दिन महाविद्यालयात दिमाखात साजरा करण्यात आला. सर्वच विभागांनी नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले. संस्कृत विभागानेही या वर्षी Science in Sanskrit हा विषय ठरवून दिनांक २८/०२/२०२२ रोजी भित्तिपत्रक प्रदर्शनाचे आयोजन केले होते. मुख्य भित्तिपत्रके बनवण्याआधी विद्यार्थ्यांना त्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. संभाव्य विषयांची कल्पना देऊन विषय निवडीसाठी सहाय्य करण्यात आले. विषयांची निवड आणि भित्तिपत्रकाचे आरेखन प्रत्येक विद्यार्थ्यांनी स्वतः केले. या उपक्रमात एकूण ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नौकाशास्त्र, भूगर्भशास्त्र, भौतिकशास्त्र, अवकाशशास्त्र अशा विविध विषयांवरील भित्तीपत्रके मुलांनी बनवून सादर केली. या प्रदर्शनास महाविद्यालयाच्या उप-प्राचार्य मा. योगिनी मुळे मॅडम, सायन्स फोरमचे मा. इंदुलकर सर तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी आवर्जून भेट देऊन भित्तिपत्रकांची माहिती घेतली.






Noted
IQAC

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

श्री. अ. किल्लेदार

श्री. अनिरुद्ध किल्लेदार.

संस्कृतविभागप्रमुख